# मराठी विभाग : शैक्षणिक अहवाल २०२४ – २५

**शैक्षणिक वर्ष २०२४ मध्ये मराठी विभागाची विद्यार्थी संख्या**

| वर्ग | विद्यार्थी संख्या |
| --- | --- |
| द्वितीय वर्ष कला (मराठी विशेषस्तर ) | ६७ |
| द्वितीय वर्ष कला (मराठी विशेषस्तर ) | ३९ |
| एम.ए.मराठी प्रथम वर्ष | २० |
| एम.ए.मराठी द्वितीय वर्ष | ७ |
| पीएच.डी. | २ |

शैक्षणिक वर्ष २०२४ मध्ये मराठी विभागाने मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली **खालील उपक्रम राबविले.**

१) दि. ३०/७/२०२४ रोजी मराठी विभागाच्या वतीने अक्षरपेरणी नियतकालिकाचे **संपादक मा. बाळासाहेब घोंगडे यांचे 'मन मै है विश्वास एक प्रेरणादायी आत्मकथन' या विषयावर व्याख्यान** आयोजित करण्यात आले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब, उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी. कुलकर्णी डॉ. संजय शिंदे, उपस्थित होते.

२) दि. ३०/७/२०२४ रोजी मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांच्या सौजन्याने वाचनसंस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी **प्रथम वर्ष कला विभागातील सुमारे ७५ विद्यार्थ्यांना मा. विश्वास नांगरे पाटील यांचे 'मन मै है विश्वास' या अभ्यासक्रमाला असलेल्या आत्मकथनाचे वाटप करण्यात आले.** या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब, उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर, अक्षरनियतकालिकाचे संपादक मा. बाळासाहेब घोंगडे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी. कुलकर्णी डॉ. संजय शिंदे, उपस्थित होते.

३) दि. २६/९/२०२४ रोजी मराठी विशेषस्तरावर अध्यापन करणाऱ्या मराठी विभागातील सुमारे १५ विद्यार्थ्यांची क्षेत्र भेट (शैक्षणिक सहल) म्हणजे **वनसचेतन शिबीर खेड तालुक्यातील राजगुरूनगर – भोरगिरी – भीमाशंकर** अशी आयोजित करण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, भूगोल विभाग प्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रा.मच्छिंद्र मुळूक यांनी नियोजन केले.

४) दि. १५/१०/२०२४ रोजी मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त **वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन** करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील निवृत्त प्राध्यापक अनिल कुलकर्णी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील उपस्थित होते. प्रथमत: माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. **गायत्री कौदरे या विद्यार्थिनीचे डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली.** प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी शेवटच्या श्वासापर्यंत ज्ञानसाधना केली. म्हणून त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांनी खूप वाचन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

५) दि. १५/१०/२०२४ रोजी मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील **निवृत्त प्राध्यापक अनिल कुलकर्णी यांचे व्याख्यान** आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. अनिल कुलकर्णी म्हणाले की, वाचनामुळे बुद्धीचा, अनुभवाचा आवाका वाढतो. ज्ञान व माहिती मिळते. वैचारिकता, संवेदनशीलता, भाषासमृद्धी, कल्पनाशक्तीचा विकास होतो. म्हणून समृद्ध जीवन जगायचे असेल तर वाचन आवश्यक आहे. प्रा. अनिल कुलकर्णी पुढे म्हणाले की वाचनामुळे मूल्यविचार रूजतो. आपण अंतर्मुख होतो. आपल्या जाणीवा प्रकल्प होतात. संवेदनशीलता जपता येते. विद्यार्थ्यांनी कथा-कवितेच्या माध्यमातून व्यक्त व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

६) दि. १८/१०/२०२४ रोजी मराठी विभागाच्या वतीने वाचन संस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी कला शाखेतील निवडक १०० विद्यार्थ्यांना वाचनवाटा उपक्रमांतर्गत साधना **साप्ताहिकाच्या बालकुमार व युवा दिवाळी अंकांचे वाटप ॲड.देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब** (खे. ता. शि. प्र. मं. अध्यक्ष) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, डॉ. बी.डी.अनुसे, प्रा. रौनक भिसे उपस्थित होते. या प्रसंगी संस्था अध्यक्ष ॲड.देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, जगण्याच्या प्रश्नांची उत्तरे म्हणजे वाचनालये असून वाचन म्हणजे जगण्याचा रियाज आहे. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, माणसा - माणसातले आणि माणुसकीतील अंतर दिवसेंदिवस वाढत चालले असून माणुसकीचा धर्म जागवण्यासाठी वाचनसंस्कृतीची जोपासना करणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठी

विभागाने राबविलेला वाचनवाटा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल त्यांनी समस्त मराठी भाषिकांचे अभिनंदन केले. **प्राचार्य डॉ. एस एस पिंगळे** यांनी वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी विचारांची, पुस्तकांची देवाणघवाण आवश्यक असल्याचे सांगून ज्ञान हे ग्रंथांच्या अभ्यासाने आणि वाचनानेच मिळू शकते असे सांगितले. त्यासाठी वाचनवाटा उपक्रम स्तुत्य असल्याचे ते म्हणाले.

७) दि. १/१/२०२५ रोजी खेड तालुक्याचे माजी आमदार, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष **स्व. साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या २३ व्या पुण्यस्मरण दिनानिमित 'ऐसी अक्षरे' देखणी मेळवीण... उपक्रमांतर्गत हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन** करण्यात आले. यात सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. काहींची अक्षरे मोत्याप्रमाणे टपोरी, काहींची वळणदार, नाजूक.. काहींचे कम्प्युटरवरून प्रिंट काढल्यावर दिसावे, असे सुरेख अक्षर तर काहींनी बोरूने लिहिले असे वाटावे इतके रेखीव .... एकाहून एक सरस अशी शब्दफुले कागदावर उमटत गेली अन् वाचकच नव्हे तर परीक्षकही नकळत या हस्ताक्षरांच्या प्रेमात पडले.

८) दि. २३ जानेवारी २०२५ रोजी **मराठी भाषा पंधरवडा** साजरा करण्यासाठी 'मराठी भाषा सद्यस्थिती आणि भवितव्य' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालय राजगुरुनगर येथील **लेखक व समीक्षक व मराठी विभाग प्रमुख प्रा. साईनाथ पाचारणे यांचे व्याख्यान** आयोजित करण्यात आले.

९) दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी, भूगोल आणि इंग्रजी विभागाच्या सुमारे १२० विद्यार्थ्यांनी **महाबळेश्वर जवळील भिलार या देशातील पहिल्या पुस्तकांच्या गावाला शैक्षणिक भेट देऊन वाचनाचा आनंद घेतला.**

१०) दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी **भाषा गौरव दिनाचे आयोजन** करण्यात आले. या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे म्हणाले की, मराठी भाषा गौरव दिन म्हणजे आपल्या मायबोलीचा सन्मान करण्याचा आणि समृद्ध वाटचालीला उजाळा देण्याचा दिवस आहे. प्रा. रौनक भिसे यांनी मराठी भाषा आणि करिअरच्या संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

११) मराठी विभागाच्या वतीने **जागतिक महिला दिनानिमित्त दि. ८ मार्च २०२५ रोजी मराठी साहित्यातील स्त्रीवादी कवितांचा जागर** करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. रौनक भिसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. काही विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. 'स्त्रीवादी कवितांचे सुगम लेखन' ही पोस्टर स्पर्धा

आयोजित करण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक – कु. श्वेता संतोष ठोंबरे, द्वितीय क्रमांक – कु. प्रिया काळूराम भालसिंगे, तृतीय क्रमांक – कु. सिमरन संतोष कोळेकर यांचा आला.

१२) मराठी विभागाच्या वतीने **तृतीय वर्ष कला शाखा व एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन दि. २८ मार्च २०२५ रोजी** सकाळी ९.३० वा. स्व. विठ्ठलराव बुट्टेपाटील सभाग्रहात करण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'स्त्रीवादी कवितांचे सुगम लेखन' ही पोस्टर स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या हस्ते पुस्तके भेट देऊन सन्मानित करण्यात आले. या विद्यार्थ्यांनी मराठी विभागाला सुमारे ३५००/- रुपयांची पुस्तके भेट दिली. या पुस्तकांचा स्वीकार मा. प्राचार्य व विभागातील प्राध्यापकांनी केला. या कार्यक्रमात नुकताच मराठी विभागात पीएच.डी.ला प्रवेश झालेल्या सौ. प्रतीक्षा खराडे आणि श्री. तुषार गभाले यांनी विद्यार्थ्यांना सेट/नेट परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले. मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या उपक्रमांविषयी माहिती दिली. डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. रौनक भिसे, कु. नवीन डोंगरे, प्रणव तिमुने यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कु. ज्ञानेश्वरी थोरात हिने तर आभार कु. वैष्णवी लोखंडे हिने मानले. या कार्यक्रमाचे आयोजन द्वितीय वर्ष कला व एम.ए.प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला एक पेन व अल्पोपहाराची व्यवस्था केली.

१३) ६ मे २०२५ रोजी **कु. दिव्या पिंगळे या विद्यार्थिनीस** संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब, उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या हस्ते वाचकवीर पुरस्कार (सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ४ हजार रुपये किमतीची पुस्तके ) देऊन सन्मानित करण्यात आले.

**इतर उल्लेखनीय बाबी -**

**डॉ. संजय शिंदे यांचे संशोधन कार्य :**

**पुस्तक प्रकाशन :**

१) **महात्मा फुले समग्र वाडमय : प्रेरणा आणि आविष्कार या शीर्षकाचे पुस्तक प्रकाशित** अथर्व पब्लिकेशन धुळे, एप्रिल २०२५ (**ISBN No.** 978-93-6186814-6)

**संपादित पुस्तकात लेख प्रकाशित :**

१) **'आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाजसुधारकांचे योगदान'** या संपादित पुस्तकात लेख प्रकाशित (स्नेहवर्धन प्रकाशन पुणे. २०२५ **ISBN No.** 978-81-19301-39-3)

**संशोधन  नियतकालिकात लेख प्रसिद्ध :**

१) महात्मा फुले यांच्या साहित्यामधील मानवी मूल्यांचे दर्शन

२)आधुनिक भारताच्या जडणघडणीत महात्मा फुले यांचे योगदान

३)दलित आत्मकथनातून प्रतिबिंबित होणारे वंचित व शोषितांचे जीवनदर्शन

४) शेत – शिवाराशी हितगुज साधणारा कवितासंग्रह : 'शिवार'

५) लावणी, फटका : स्वरूप आणि संकल्पना

६) लिंगभाव आणि मनस्विनी लता रवींद्र यांच्या कथेतील लिंगभावात्मक संवेदना

**महाविद्यालयीन चर्चासत्रास उपस्थिती**

१) दि. ७ ऑक्टोंबर २०२४ रोजी **कला व वाणिज्य महाविद्यालय माढा** यांनी आयोजित केलेल्या 'मराठी साहित्यातील मानवी मूल्ये' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग घेऊन शोधनिबंध सादर केला.

२) दि. १२/२/२०२५ रोजी **महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी पुणे** येथे आयोजित 'आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाजसुधारकांचे योगदान' या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रास उपस्थिती व शोधनिबंध सादर केला.

३) दि. ८/२/२०२५ रोजी **छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा** येथे आयोजित 'साहित्यातून चित्रित होणारे वंचित व शोषितांचे प्रतिबिंब'  या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रास उपस्थिती व शोधनिबंध सादर केला.

Faculty Development Course

डॉ. संजय शिंदे यांनी संत गाडगेबाबा अमरावरी विद्यापीठांतर्गत  Online short Term Course  'Design of Thinking  - Excellent Learning Outcomes ' दि. २५ फेब्रुवारी ते ७ मार्च २०२५ दरम्यान 'A' ग्रेडसह विशेष प्रविण्याने पूर्ण केला.

**डॉ. संजय शिंदे यांनी खालील  उपक्रमात सहभाग घेतला.**

१) दि.२४ व २५ जून २०२४ रोजी **रोजगार मेळाव्याचे** आयोजन केले.

२) दि.२७/६/२४  रोजी **NEP कार्यशाळा** सोमेश्वरनगर बारामती येथे उपस्थित राहिलो.

३) १५ जुलै २०२४ रोजी  **बारामती येथे युवा कौशल्य** दिनानिमित्त झालेल्या करिअर कट्टा अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेत सहभाग घेतला.

४) **दि.** ६ सप्टेंबर २०२४ रोजी **कायदेविषयक जनजागृती शिबिरात** सूत्रसंचालन केले.

५) दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी **साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात** राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

६) दि. ३०/९/२०२४ रोजी महाविद्यालयातील **बारावी कला** ( तुकडी क ): करिअर मार्गदर्शन

७) दि. १/१०/२०२४ रोजी महाविद्यालयातील **बारावी कला** ( तुकडी अ ): करिअर मार्गदर्शन

८)  दि. ३/१०/२०२४ रोजी महाविद्यालयातील **बारावी कला** ( तुकडी ब ): करिअर मार्गदर्शन

९)  दि. ४/१०/२०२४ रोजी महाविद्यालयातील **बारावी कला** ( तुकडी ड ): करिअर मार्गदर्शन

१०)दि. ७ डिसेंबर २०२४ रोजी पंचायत समिती खेड यांच्या वतीने शिक्षक सक्षमीकरण स्पर्धेत परीक्षक म्हणून कामकाज केले.

११)दि. ७ जानेवारी २०२५ रोजी वाचन संकल्प अभियानांतर्गत सार्वजनिक वाचनालय राजगुरुनगर येथे लेखक आपल्या भेटीला कार्यक्रमात मार्गदर्शन केले.

१२)दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी  आदर्श विद्यालय आंबोली येथे इयत्ता १० वी व १२ वी  च्या निरोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलो.

डॉ. संजय शिंदे

मराठी विभाग प्रमुख

हुतात्मा राजगुरु महाविद्यालय

राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे,